# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

# दिनांक ०९/१२/२०२० (बुधवार)

## दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण करून अतिप्रसंग

पोलीस ठाणे सावनेर :– अंतर्गत दिनांक ०५/११/२०२० चे १३.३० वा. दरम्यान फिर्यादी महिला यांच्या १५ व १४ वर्षीय दोन मुलींना १) आकाश सुरजसिंग सोनारिया, वय २०वर्षे, रा. सद्भावना कॉलनी, पाटनसावंगी, २) सागर राजेद्र धुर्वे, वय २२, रा. बोरदेही ता. आमला, जि. बैतुल (म.प्र.) ३) करण रमाकांत कश्यप, वय १८, रा. सद्भावना कॉलनी, पाटणसावंगी यांनी फिर्यादीच्या कायदेशिर रखवालीतुन पितमपुर, जिल्हा इंदोर (म. प्र.) येथे फुस लावुन पळवुन नेले. दरम्यान त्यांचे अज्ञानपणाचा फायदा घेवुन वेळोवेळी अतिप्रसंग केला. सदर प्रकरणी नमुद तिन्ही इसमांविरूद्ध अल्पवयीन मुलींच्या जबानीवरुन आणि फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सावनेर येथे कलम ३६३, ३७६, ३७६ (२), ३४ भादंवि सहकलम ३, ४, ५, ६पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती रासकर या करीत आहेत.

## चोरी

पोलीस ठाणे काटोल :– अंतर्गत दिनांक ०७/१२/२०२० चे २०.०० वा. ते दिनांक ०८/१२/२०२० चे ०६.०० दरम्यान फिर्यादी ऋषीकेश प्रमोद देवघरे, वय ४१ वर्षे, रा. शारदा चौक, काटोल यांनी आपली मोटार सायकल क्र. एमएच ४०/डी ३१३५ किंमत १०,०००/– रु. ची नेहमीप्रमाणे आपल्या अंगणात उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने त्यांची मोटार सायकल चोरून नेली. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे काटोल येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक सुरेश लांडे हे करीत असुन आरोपीचा शोध सुरू आहे.

पोलीस ठाणे सावनेर :– अंतर्गत दिनांक ०२/१२/२०२० चे २३.०० वा. ते ०३/१२/२०२० चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी अखिल धनराज झटाले, वय ३० वर्षे, रा. सावनेर यांनी त्यांची मोटार सायकल क्र. एमएच ४०/एस ६५८६ किंमत ०७,०००/– रु. ची राजकमल चौक, सावनेर येथे उभी करून किराणा सामान घेण्याकरीता गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्यांची मोटार सायकल चोरून नेली. सदर प्रकरणी पोलीस ठाणे सावनेर येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री बोरकर हे करीत असुन आरोपीचा शोध सुरू आहे.

पोलीस ठाणे रामटेक :— अंतर्गत दिनांक ०६/१२/२०२० चे ०८.०० वा. ते ०८/१२/२०२० चे ०७ वा. दरम्यान फिर्यादी प्रविण मारोती ननोरे, वय ३२ वर्षे, रा. पारडी, नागपूर यांनी मौजा आमडी येथे आपले मावशीचे घरी त्यांची मोटार सायकल क्र. एमएच ३१/डीवाय ६११० किंमत २२,०००/— रु. ची लॉक लावुन उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चाराने त्यांची मोटार सायकल चोरून नेली. सदर प्रकरणी पोलीस ठाणे रामटेक येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री रामेश्वर रावते हे करीत असुन आरोपीचा शोध सुरू आहे.

## फुस लावुन पळवुन नेले (अपहरण)

पोलीस ठाणे एमआयडीसी (बुटीबोरी) :— अंतर्गत दिनांक ०८/१२/२०२० चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी किन्ही भारकस येथे जाते असे सांगुन घरून गेली असता परत आली नाही. सदर प्रकरणी फियादी यांचे तक्रारीवरून संशयीत इसम अनिरूद्ध रोडगे, रा. बुटीबोरी याने त्यांचे अल्पवयीन मुलीच्या अज्ञानपनाचा फायदा घेवुन फुस लावुन पळवुन नेल्याच्या तक्रारीवरून त्याचेविरूद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी (बुटीबोरी) येथे कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री तलमले हे करीत असुन अल्पवयीन मुलगी आणि आरोपीचा शोध सुरू आहे.

## अपघातात मृत्यु

पोलीस ठाणे उमरेड :— अंतर्गत दिनांक दिनांक ०८/१२/२०२० चे १६.०० वा. ते १६.३० वा. दरम्यान मौजा डांबरी रोड शिवारातील बालपांडे यांचे शेताजवळ ज्ञानेश्वर श्यामराव चंदनबावणे, वय ३८ वर्षे, रा. जवळी, ता. भिवापूर हे त्यांचे मोटार सायकलने भिवापूर येथे जात असतांना मोटार सायकल क्र. एमएच ४०/बीए २५९२ चा चालक संतोष तुळशीराम बेलेकर, वय ४२ वर्षे, रा. घाटंजी, जिल्हा यवतमाळ याने आपले वाहण भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन त्यांचे मोटार सायकलला धडक मारल्याने गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावले. सदर प्रकरणी फिर्यादी राजु हरीभाऊ चंदनबावणे, वय ४१ वर्षे, रा. मंगळवारीपेठ, उमरेड यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे उमरेड येथे संतोष तुळशीराम बेलेकर यांचेविरूद्ध कलम २७९, ३३७, ३०४(अ) भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री लोले हे करीत आहेत.